# प्रेस नोट

'नवे शिक्षणविषयक धोरण २०१६ : उच्चशिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण' या विषयावरील चर्चा

शनिवार, दिनांक: सप्टेंबर २४, २०१६

सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. २४/०९/२०१६ रोजी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या चर्चगेट येथील प्रांगणात एक दिवसीय चर्चेचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

जून २०१६ पासून 'नवे शिक्षणविषयक धोरण २०१६' चा मसुदा पब्लीक डोमेनमध्ये (http:mhrd.gov.in/nep-new) उपलब्ध करण्यात आला आहे. भारत सरकार राष्ट्रच्या उभारणीत उच्च शिक्षणाचे साधन मूल्य अधोरेखित करुन नवे परिप्रेक्ष निर्माण करुन जागतिक संदर्भात उच्च शिक्षणामधील नव्या आव्हानांविषयी संवाद साधूइच्छित आहे.

ही चर्चा उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण (विभाग ४.१८) यावर केंद्रीत असून महाराष्ट्रातील आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमधील वक्ते यामध्ये सहभागी होतील. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. शशिकला वंजारी या चर्चेचे उद्घाटन करतील. डॉ. अपूर्वा पालकर, कन्व्हीनर, टास्क फोर्स, उच्चशिक्षणाचे जागतिकीकरण (महाराष्ट्र) या चर्चेचे प्रस्ताविक करतील. श्री. शिताराम कुंटे, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन हे चर्चेला उपोद्घात करतील आणि मान्यवर शिक्षणतज्ञ डॉ. राम ताकवले हे बीजभाषण करतील.

चर्चेमध्ये पुढील व्यापक सूत्रे विचारात घेतली जातील :

- जगातील उत्कृष्ठ विद्यापीठांबरोबर संबंध : प्रश्न आणि आव्हाने
- भारतीय विद्यापीठांची/संस्थांची कॅम्पसेस भारताबाहेर स्थापन करण्यासाठी आणि परदेशी विद्यापीठांची /संस्थांची कॅम्पसेस भारतामध्ये स्थापन करण्यासाठी नियमावलीमध्ये प्रस्तावित बदल
- कॅम्पसमध्ये विविधता: विद्यार्थी, भारतीय विद्यापीठांमध्ये परदेशी शिक्षक वर्ग, आर्थिक तरतुदींविषयी पर्याय आणि नियमावलीमध्ये बदल.

डॉ. विद्यासागर पंडित कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा नांदेड विद्यापीठ, नांदेड, प्रो. अडेले मार्शल ग्रॅास, फ्रेंच वकालत, श्रीमती मंजुला राव, सहाय्यक संचालक, ब्रिटीश काऊन्सील आणि श्री. अमित दासगुप्ता, कंट्री हेड, न्यू साऊथ वेल्य विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया हे जगातील 'उत्कृष्ठ विद्यांपीठाबरोबर संबंध' या सत्रांवर चर्चा करतील.

भारतीय विद्यापीठांची/संस्थांची कॅम्पसेस भारताबाहेर स्थापन करण्यासाठी आणि परदेशी विद्यापीठांची/संस्थांची कॅम्पसेस भारतामध्ये स्थापन करण्यासाठी नियमावलीमध्ये प्रस्तावित बदल या सत्रांवर चर्चा करण्यासाठी दोन विद्यापीठातील कुलगुरु आणि या क्षेत्रातील विषयतज्ञ येणार आहेत. डॉ. एस. पी. काणे, कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, ॲड. एस. के. जैन, डॉ. गुलाब मेवाणी, सीईओ, ब्राझील चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई आणि डॉ. एस.व्ही. कल्याणकर, कुलगुरु, गोंदवण विद्यापीठ हे मान्यवर या चर्चेत सहभागी होतील.

डॉ. बी. चोपडे, कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, श्री. संगीथ व्हर्गिस, माजी प्रिन्सिपल कन्सलटंट, UNO आणि २०११ मधील जगातील पहिल्या दहामधील एक विचारवंत, श्री. आदित्य मलकाणी, कंट्री डायरेक्टर—फ्रिंग्ज कॉलेज विद्यापीठ आणि डॉ. एन. ढल. मालदार, कुलगुरु सोलापूर विद्यापीठ हे 'कॅपसमध्ये विविधता: विद्यार्थी, भारतीय विद्यापीठामध्ये परदेशी शिक्षक वर्ग, आर्थिक तरतुदी विषयी पर्याय आणि नियमावलीमध्ये बदल' या सूत्रावर बोलतील.